MHLA050001622019

नियमीत दिवाणी दावा क्र.१५/२०१९
राम वि. शासन

## नि.क्र.८७ खालील आदेश

**०१.** सदर अर्ज वादीने देवून नमूद केले की, सदर दाव्यात सहमालकी आणि सहकब्जाआधारे वादी व अन्य ९८ लोकांनी ज्यात प्रतिवादी क्र.४ व ५ यांचाही समावेश आहे. प्रस्तावित राजसारथी गृहनिर्माण संस्थेसाठी जागेसंदर्भाने दावा दाखल असून प्रतिवादी क्र.४ ने प्रतिवादी क्र.५ च्या नावे या संस्थेसाठी जागा खरेदी केली आणि सदरचा व्यवहार बेनामी असल्याची कबुली नि.क्र.३४ मध्ये दिली. या खरेदीपत्राच्या सही शिक्क्याच्या नक्कलेला निशाणी देण्यासाठी वादीने विनंती केली आहे. सदर दस्तावेज हा खाजगी असला तरी शासकीय कचेरीतून उपलब्ध असलेला आहे. त्यामुळे, तो कागद प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्या कब्जात मुळ स्वरुपात असला तरी अन्य प्रतिवादींच्या दहशतीमुळे या दस्तावर साक्ष देण्यासाठी प्रतिवादी क्र.४ व ५ येत नाहीत. त्यामुळे, भारतीय पुरावा कायदा १८७२ कलम ६५(अ) व ६६ प्रमाणे देण्यात येणारी नोटीस क्षमापित करून दुय्यम निबंधक अहमदपूर यांना याकामी साक्षीसाठी बोलवावे अशी विनंती करण्यात आली. सोबत शपथपत्र नि.क्र.८८ देण्यात आले आहे.

**०२.** प्रतिवादींतर्फे देण्यात आलेल्या म्हणण्यात मुळ दावाच न्यालयात चालण्यासारखा नसल्याने आणि वादीच्या उलटतपासात सदरचे खरेदीपत्र खरे व बरोबर असल्याचे त्याने कबुल केले असल्याने आक्षेप घेण्यात आला.

**०३.** याकामी प्रतिवादी क्र.५ यांच्या नावे खरेदीपत्र झाले असल्याचे कैफीयत नि.क्र.३१ कलम १२ मध्ये नमूद आहे. सदरचे खरेदीपत्र प्रतिवादी क्र.५ हिचे एकटीचे आहे की, प्रस्तावित सोसायटीसाठी आहे याबद्दल वाद नंतर निर्णीत करण्यात येईल. मात्र खरेदीपत्र नोंदणीकृत असल्याने त्याची सही शिक्क्यांची नक्कलही पुराव्यात वाचता येईल. कागदपत्रांना निशाणी देणे हा तांत्रिक भाग आहे. त्याची सत्या-असत्यता, त्याची वैधानिक आणि पुराव्याच्या दृष्टीने मुल्य हा नंतरचा भाग आहे. त्यामुळे, सही शिक्क्याच्या नक्कलेस निशाणी

देण्यास कोणतीही अडचण नाही. सदर दस्त मुळ स्वरुपात न्यायालयापुढे असावा हे कायद्याचे तत्व आहे. कारण, तो प्राथमिक पुरावा असतो. असा दस्त न्यायालयापुढे मुळ स्वरुपात न आल्यास भारतीय पुरावा कायदा कलम ६६ मधील नमुद तरतुदींप्रमाणे आवश्यक ती तजवीज करुन दुय्यम पुरावा देण्यात येतो. सही शिक्क्याची नक्कल हा दुयम पुरावा होवू शकतो कारण प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी त्यांच्याकडील मुळ खरेदीपत्र आणलेले नाही. खरेदीपत्रातील मजकुर मान्य असल्याने त्याकामी सदर खरेदीपत्रास किंवा त्याच्या साक्षार्कींत प्रतीस प्रकरणामध्ये संबोधन करता यावे म्हणून निशाणी देण्यास कोणतीही अडचण नाही.

**०४.** दुय्यम निबंधक अहमदपूर यांना साक्षी समन्स काढल्यानंतर ते या दस्ताच्या नोंदणीबद्दल सांगू शकतील किंवा त्यांनी दस्त नोंद करण्यापुर्वी कायद्याने त्यांना आवश्यक बाबींची जी पुर्तता केली, ती सांगू शकतील. त्यातील मजकुर शाबीत करणे, तो खरा व बरोबर असण्याबद्दल त्यांना प्रश्न विचारता येणार नाहीत. सदर दस्त हा खाजगी असला तरी सार्वजनिक कार्यालयात नोंद करुन कायद्याप्रमाणे त्याची प्रत दुय्यम पुरावा म्हणून ग्राहय असल्याने तो दस्त शाबीत करण्यासाठी दुय्यम निबंधकाची साक्ष आवश्यक नाही. सदर खरेदीपत्राच्या सही शिक्क्याच्या नक्कलेस थेट निशाणी देता येवू शकते. त्यामुळे, त्यावर दुय्यम पुरावा देण्याची सुध्दा गरज नाही. सबब, अर्ज नामंजूर.

स्वाक्षरीत/-

**दिनांक १५/१०/२०२५.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**